**<u>प्रतिवादी क्र.१ तर्फे उलटतपास – श्री. ए. एस. फराकटे वकील.</u>**

**१०.** माझे शिक्षण झालेले नाही. मला दावा मिळकतींचे गट क्रमांक आणि क्षेत्र सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या शपथपत्रातील मजकूरा बाबत मला माहिती नाही. मला सदर दावा किती जमिनींसाठी दाखल केला आहे याबाबत सांगता येणार नाही.

**११**. दावा मिळकतीच्या पुर्वेला गणपती देवरकर याचे घर, पश्चिमेला रेडेकरची पडजमीन, दक्षिणेला तुरटे चे घर आणि उत्तरेला कोण आहे याबाबत मला सांगता येणार नाही. पुर्वी आमचे गाव कोवाड महसूल अंतर्गत होते. मला आमच्या गावात गट एकत्रीकरण झाल्याची माहिती आहे. मला त्यावेळी आमचे गाव कोवाड महसूल अंतर्गत असल्याची माहिती नाही. मला दावा मिळकतींचे पुर्वीचे सर्वे क्रमांक आणि पोटहिस्से सांगता येणार नाही.

**१२**. प्रतिवादी क्र.१ माझा मुलगा असून फार पुर्वीपासून मुंबईला नोकरी करतो. तो फार पुर्वीपासून वेगळा राहून स्वतंत्र कारभार करत आहे. दावा मिळकत गावाजवळची असल्यामुळे तिची नगरभूमापन कार्यालया मार्फत मोजणी होऊन नकाशे झालेले आहेत. दावा मिळकत पुर्वी सुभाना व आबा देवरकर यांच्या मालकीची होती. त्यांच्या मिळकतीचा पुर्वीचा न.भू.क्र.८३१ होता. सदर मिळकत प्रतिवादी क्र.१ ने दि.२२.०५.१९८९ रोजी खरेदी केलेली आहे. साक्षीदार स्वतःहून सांगते, तिला फसवून त्याने खरेदी केलेली आहे.

**१३**. सदर मिळकत खरेदी केल्यापासून प्रतिवादी क्र.१ च्या ताब्यात आहे. न.भू.क्र.८३१ च्या दक्षिणेला न.भू.क्र.८३३ असून ती तुकाराम विठू देवरकर यांच्या घराण्याची आहे. त्यामध्ये त्यांच्या तीनही भावांची प्रत्येकी १/३ प्रमाणे वहिवाट होती. आकूबाई तुकारामची भावजय होती. न.भू.क्र.८३३ ची जागा प्रतिवादी क्र.१ ने आकूबाई देवरकर कडून खरेदी केलेली आहे. धोंडिबाच्या घराण्यात धोंडिबा हा मोठा मुलगा असल्यामुळे त्याचे नाव ए.कू.पु. म्हणून लागले होते. तुकारामला सखाराम व आप्पा असे दोन भाऊ होते. सखाराम ४५ वर्षांपूर्वी वारलेला आहे. त्याच्या पश्चात सदर मिळकतीला पत्नी आकूबाई आणि भाऊ तुकाराम व आप्पा यांची नावे लागली होती. तुकाराम मयत झाल्यानंतर त्याचा मुलगा धोंडीबा याचे नाव लागले होते.

**१४**. न.भू.क्र.८३३ मध्ये आकूबाईला ३० चौ.मी. जागा होती. ती जागा प्रतिवादी क्र.१ ने ३५ वर्षांपूर्वी खरेदी केलेली आहे. त्यावरती ३० वर्षांपूर्वी प्रतिवादी क्र.१ ने घर बांधलेले असून त्याची

ग्रामपंचायतीला नोंद झालेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदर घरामध्ये बांधकाम झाल्यापासून प्रतिवादी क्र.१ राहतो. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र.१ ने घर बांधल्यापासून आम्हाला राहायला घेतलेले नाही. माझ्याकडे प्रतिवादी क्र.१ ला जागा खरेदी करण्यासाठी आणि घर बांधण्यासाठी पैसे दिल्याचा लेखी पुरावा नाही. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र.१ ने त्याच्या नोकरीच्या पैशांतून घराचे बांधकाम केले आहे.

**१५**. माझ्या पतीचे पुर्ण नाव नारायण मसणू कातकर आहे. माझ्या पतीच्या मालकीचे घर आहे. मी लग्नापासून पतीसोबत त्याच्या घरात राहत आहे. माझ्या वडिलांचे नाव जोतिबा तातोबा देवरकर होते. मला माझे वडिल कधी वारले याबाबत सांगता येणार नाही. माझे वडिल महात्मा गांधी वारल्यानंतर देशात झालेल्या जाळपोळीवेळी वारले होते. मला माझ्या वडिलांनी कुठलीही मिळकत दिलेली नसून माझ्या नावावरती नाही. माझी दावा मिळकती वरती मालकी नाही.

**१६**. माझे पती माझी संपुर्ण देखभाल करतात. प्रतिवादी क्र.१ नोकरीला लागल्या पासून स्वतंत्र राहून त्याचे व्यवहार करत आहे. मी प्रतिवादी क्र.१ च्या नावे झालेल्या घराच्या नोंदीला तक्रारअर्ज देऊन ग्रामपंचायत व नगरभूमापन कार्यालयाकडे आक्षेप घेतलेला नाही. मी या दाव्या व्यतिरिक्त प्रतिवादी क्र.१ च्या विरोधात कोणतीही कारवाई केलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी प्रतिवादी क्र.१ ला दाव्यापूर्वी वकिलां मार्फत नोटीस पाठवलेली नसून त्याला मिळालेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र.१ ला नोटीस मिळालेली नसल्यामुळे त्याने प्रतिउत्तर दिलेले नाही. प्रतिवादी क्र.१ ने स्वतंत्र घर बांधून राहण्यास सुरुवात केल्यामुळे आमचे त्याच्या सोबत वाकडे आहे. मला प्रतिवादी क्र.१ व्यतिरिक्त दोन मुले व एक मुलगी असून त्यांची प्रतिवादी क्र.१ च्या खरेदी पत्राबाबत तक्रार नाही. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र.१ ला त्रास देण्यासाठी दावा मिळकतीशी कोणताही संबंध नसून खोटा दावा दाखल केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटा पुरावा दाखल करुन आज खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.** **श्रवणोत्तर स्विकृती,**

Digitally signed by RAVI PANDURANG THORE

(आर. पी. थोरे)

दिनांक – २७.०१.२०२५. दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, आजरा.